## " पर्यावरणपूरक महामेट्रो पुणे प्रकल्प "

महामेट्रोच्या पुणे मेट्रो या प्रकल्पाच्या प्रत्येक टप्प्यावर "महामेट्रो" पर्यावरणाच्या बाबींविषयी अतिशय संवेदनशील आहे.

सूर्यप्रकाश आणि नैसर्गिक वायुविजन यांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याची योजना आहे. हरित उपक्रमाअंतर्गत डेपोंवर आणि उन्नत स्थानकांवर सौर तक्त्यांच्या उपयोगामुळे १७ एमडब्ल्यू विजेचा पुरवठा होईल. त्यायोगे विजेच्या आवश्यकतेच्या ६५% वीज उपलब्ध होईल. स्थानकांवरील पर्जन्य जलसंचय यंत्रणेमुळे २७,५०० क्यू. मी. पाण्याचे पुनर्भरण होईल. नागपूर येथे आम्ही पाण्यावरील पुन:प्रक्रियेसाठी आणि पुनर्वापरासाठी बायो-डायजेस्टर्सचा वापर केलेला आहे. सार्वजनिक स्वच्छता गृहात फ्लश करण्यासाठी पुरेसे पाणी उपलब्ध व्हावे म्हणून सांडपाणी प्रक्रियेसाठी आर्द्र जमीन प्रक्रियेची चाचपणी आम्ही करत आहोत. पर्जन्य जलसंचय यंत्रणेसाठीच्या आमच्या प्रयत्नामुळे प्रतिवर्षी २७,५०० क्यू. मी. पाण्याचे पुनर्भरण होईल.

नागपूर येथील महामेट्रोच्या स्थानकांना IGBC प्लाटीनम दाज मिळालेला आहे आणि आम्ही पुण्यासाठीसुद्धा हाच किंवा याहून वरचा दर्जा राखण्याचे प्रयत्न आहेत.

बांधकामावर देखरेख ठेवताना आवाज, कंपने, हवेचा दर्जा, पाणी या बाबींकडे नियमित लक्ष दिले जाते. आमच्या पुणे मेट्रो प्रकल्पाच्या कार्यवाहीत नदी पात्रातील काम आणि भुयारी काम ही आव्हाने आहेत, या कामात दाटीवाटीच्या भागातील लोकांना कमीतकमी त्रास होईल याची काळजी घेतली जात आहे.

मुठा नदीच्या पात्रातील बांधकाम पूर्णत: विचार करून करीत आहोत आणि त्याला निरी, राष्ट्रीय हरित लवाद, तज्ञ आणि पुणे विद्यापीठ यांनी आमच्या तांत्रिक अहवालाला योग्य ठरविले आहे. नदी पात्रातील बांधकामाचा गैपरिणाम नगण्य असेल आणि प्रकल्प क्षेत्रातील कोणतीही दुर्मिळ किंवा नष्ट होण्याच्या मार्गावर असलेल्या प्रजाती आढळलेल्या नाहीत.

बांधकामाच्या काळात प्राणी, पक्षी, फुलपाखरे किंवा अन्य नैसर्गिक वनस्पतींना इजा पोचू नये यासाठी आम्ही अनेक उपाय योजले आहेत. बांधकाम "आतून बाहेर" (inside out) पद्धतीने केले जात आहे. नदीकाठावर शिकार, बेकायदा शिकार या गोष्टीना प्रतिबंध करण्यासाठी माहितीफलक लावण्यात आले आहेत. उत्खननांतील मातीचा वरचा थर स्वतंत्ररीत्या साठवून ती बागकामासाठी वापरली जाईल तसेच बाकीच्या तात्पुरत्या मातीच्या ढीगांचा उपयोग बांधकाम पूर्ण झाल्यानंतर पुनर्भरणासाठी केला जाईल.

नदीकाठावरील आवाज आणि हवेचा दर्जा आम्ही दर पंधरा दिवसांनी तपासत आहोत आणि हा दर्जा आखून दिलेल्या पातळीवरच असेल असेल. यासाठीची उपकरणे प्रदूषण नियंत्रण नियमांनुसार आहेत.

मेट्रोचे बहुतांश बांधकाम रस्त्याच्या मधील भागात केले जात आहे आणि वाहतुकीला योग्य मार्दर्शन करण्यासाठी प्रशिक्षित रहदारी नियंत्रक उपलब्ध असतील.

भुयारी मार्गाची कामे विनाअडथळा पार पाडण्यासाठी सेंटर फॉर रोड रिसर्च संस्थान हे कंपनांच्या अभ्यासासाठी आमचे सहकारी आहेत. इस्पितळे, शैक्षणिक संस्था आणि निवासी संकुले यासारख्या संवेदनशील ठिकाणांसाठी पुरेसे आवाज आणि कंपन-रोधक अडथळे उभारले जातील.

आतापर्यंत आम्ही ३१६५ झाडे लावली असून १९५ झाडांचे यशस्वीपणे दुसऱ्या ठिकाणी पुनर्रोपण केले आहे. वृक्षारोपण कार्यक्रमाचे हे फक्त दुसरे वर्ष आहे.
पुनर्रोपणाची ताजी स्थिती : १. हरित सकाळ (green Morning): ७८, २. पूल (viaduct): ७८, ३. स्थानके : ५४.
एकूण : २०६. (पहिला टप्पा)

ताल्जैचे वनराई : ३०००+, आकुर्डी : १२५+, सहयोग केंद्र, संत तुकाराम बस स्थानक : ४०
एकूण : ३१६५ झाडे

२०१८ साठीचे वृक्षारोपणाचे उद्‌दिष्ट : औंध प्रौद्योगिकी संस्था - १०००, टीबी २ दिघी - १५००, जीआरपी केंद्र - १५००
रेंज हिल - १०००, तळजाई - १००० = एकूण : ६००० झाडे.